मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आयुक्त शेखर सिंह यांची नाशिकला बदली

## शेखर सिंह यांची नाशिक कुंभमेळा आयुक्तपदी बदली; श्रावण हर्डीकर यांची प्रभारी आयुक्तपदी नियुक्ती

**पिंपरी | प्रतिनीधी**

कार्यकाळ समाप्तीमुळे चर्चेत असलेले पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची मंगळवारी बदली करण्यात आली आहे नाशिक कुंभमेळा आयुक्तपदी त्यांची नियुक्ती झाली असून पिंपरी चिंचवड महापालिकेचा कारभार आता श्रावण हर्डीकर सांभाळणार आहेत. दरम्यान हर्डीकर यांची पिंपरी चिंचवडच्या प्रभारी आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तपदी श्रावण हर्डीकर यांची नियुक्ती झाल्याचे अप्पर मुख्य सचिव सेवा विराधा यांनी पत्राद्वारे पिंपरी चिंचवड महापालिकेला कळविले आहे. महाराष्ट्र शासनाचे सहसचिव सुभाष उमराणीकर यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्तपदी शेखर सिंह यांची 18 ऑगस्ट 2022 रोजी नियुक्ती झाली होती. नियुक्तीपासूनच आयुक्त शेखर सिंह यांची कारकीर्द वादग्रस्त ठरली. कथित वाकड टीडीआर घोटाळ्यात सहभाग असल्याच्या आरोपांमुळे ते चौकशीच्या भोवऱ्यात सापडले होते. मुळा नदी पुनरुज्जीवन प्रकल्प, कुदळवाडी येथे झालेली कारवाई, चिखलीच्या नगररचना (टीपी) योजनेचा भंग, चऱ्होली मधील टीपी कडे दुर्लक्ष अशा अनेक वादग्रस्त मुद्द्यांमुळे त्यांच्या कार्यकाळात त्यांच्यावर टीका झाली. नुकत्याच जाहीर झालेल्या विकास आराखड्यामुळे (डीपी) अनेक नागरिकांचा रोष देखील त्यांनी ओढावून घेतला होता. ग्रीन झोनचे निवासी क्षेत्रात रूपांतर करून बिल्डर लॉबीला फायदा करून दिल्याचाही त्यांच्यावर आरोप आहे.

जून महिन्यामध्ये भोसरी येथे राष्ट्रवादी काँग्रेसचा मेळावा घेण्यात आला होता. यावेळी पुण्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शेखर सिंह यांच्या बदलीचे संकेत दिले होते. त्यांचा कार्यकाळ संपत आला आहे. त्यामुळे त्यांची लवकरच बदली होईल असे संकेत पालकमंत्र्यांनी दिले होते अखेर बदली आदेशावर शिक्कामोर्तब झाले आहे.

### हर्डीकर प्रभारी आयुक्तपदी

» महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम पाहणाऱ्या श्रावण हर्डीकर यांच्याकडे पिंपरी चिंचवड महापालिकेचा 'प्रभारी' कारभार सोपवण्यात आला आहे. हर्डीकर यांनी यापूर्वी पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त म्हणून काम पाहिले आहे. हर्डीकर हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मर्जीतील समजले जातात. हर्डीकर यांनी पिंपरी चिंचवडमध्ये कोरोना काळात अतिशय उत्तम कामगिरी केल्याचे उदाहरण आहे. कोरोना संकट काळामध्ये पिंपरी चिंचवड उद्योगनगरी मधील कामगारांना योग्य व्यवस्था पुरवून त्यांच्या स्थलांतराला थांबविण्याचे काम हर्डीकर यांनी उत्तम प्रकारे केले होते. कोरोना काळामध्ये शहरवासीयांना चांगल्या आरोग्यसेवा देण्याबरोबरच कोरोनाला थोपवण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. या काळात त्यांनी त्यांच्या उत्तम प्रशासकीय कामकाजाची चुणूक दाखविली होती.

# मराठवाड्यातील पूरग्रस्तांना पिंपरी चिंचवड पोलिसांकडून मदतीचा हात

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीला तब्बल 43 लाख 95 हजार रुपयांचा धनादेश

**पिंपरी | प्रतिनीधी**

मराठवाड्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे हजारो शेतकऱ्यांचं, नागरिकांचं मोठं नुकसान झालं आहे. अनेक गावांमध्ये घरं, जनावरं आणि शेतीपिकांचं नुकसान झाल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत. या कठीण काळात संपूर्ण महाराष्ट्रातून पूरग्रस्तांसाठी मदतीचा ओघ सुरू आहे. त्यातच पिंपरी चिंचवड पोलिसांनीही सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात पुढे केला आहे.



पिंपरी चिंचवड पोलिसांच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधीला तब्बल ४३ लाख ९५ हजार रुपयांचा धनादेश देण्यात आला आहे. हा धनादेश पोलिस आयुक्त विनायक कुमार चौबे यांनी उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्द केला. पोलिस कर्मचाऱ्यांनी स्वेच्छेने आपल्या पगारातून ही रक्कम जमा केली असून, त्यातून पूरग्रस्त शेतकरी आणि नागरिकांना मदत मिळणार आहे.

गेल्या काही आठवड्यांपासून मराठवाड्यात मुसळधार पावसाने हाहाकार माजवला होता. लातूर, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद आणि औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) जिल्ह्यांतील अनेक गावं पाण्याखाली गेली होती. हजारो हेक्टर शेती पाण्याखाली गेल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडले. अशा वेळी पिंपरी चिंचवड पोलिसांनी दाखवलेला हा सामाजिक संवेदनशीलतेचा आदर्श इतर संस्थांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. नागरिक, शासकीय अधिकारी आणि सामाजिक संस्थांकडून या उपक्रमाचं कौतुक होत आहे.

# चिखली-मोशी शिवरस्ता कोंडीवर "रामबाण उपाय"

## आमदार लांडगे यांचा आणखी एक "सर्जिकल स्ट्राईक"; बोऱ्हाडेवाडी- मोशीतील वाहतूक सक्षमीकरणासाठी नवा मार्ग

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदार संघातील चिखली-मोशी शिवरस्त्यावरील वाढत्या वाहतुकीचा ताण अखेर कमी होणार आहे. भूमिपुत्र-जागामालक आणि स्थानिक नागरिकांच्या सहकार्याने या भागाला वाहतुकीचा पर्यायी मार्ग मिळाला आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून गेल्या 1997 पासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचे काम एका रात्रीत सुरू करण्यात आले. वाहतूक सक्षमीकरणासाठी केलेल्या या "सर्जिकल स्ट्राईक"बाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये सकारात्मक प्रतिक्रिया येत आहेत.



चिखली, मोशी, बोऱ्हाडेवाडी परिसरात वाढती लोकसंख्या आणि रहदारीमुळे वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर वाहतूक सक्षमीकरणासाठी स्थायी उपाययोजना करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. त्यासाठी पर्यायी रस्ते, डीपी रस्ते विकसित करण्यास प्राधान्य दिले जात आहे.

मोशी- बोऱ्हाडेवाडी येथील वुड्सविले फेज-वन, कुमार प्रिन्सविले, स्वराज सोसायटी या परिसरातून जाणाऱ्या रस्त्याचे काम वेगाने सुरु झाले असून, या मार्गामुळे शिवरस्त्यावरील वाहतुकीचा बोजा लक्षणीय प्रमाणात कमी होणार आहे.या रस्त्यासाठी लागणारी खासगी जागा सामाजिक भावनेतून बोराटे व बोऱ्हाडे कुटुंबीयांनी विनामोबदला हस्तांतरित केली. त्यासाठी शेतकरी मधुकर बोराटे, संतोष बोराटे, सुनील बोराटे आणि सिताराम बोराटे यांनी सकारात्मक भूमिका घेतली. त्यांच्या योगदानाबद्दल आमदार लांडगे यांनी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

शेतकरी, बांधकाम व्यावसायिक आणि प्रशासन यांच्या तांत्रिक अडचणींमुळे जागा ताब्यात न आल्यामुळे प्रलंबित असलेले काही रस्ते आम्ही विकसित करण्यात यशस्वी झालो आहोत. याकामी शेतकरी, भूमिपुत्र आणि जागामालक तसेच बांधकाम व्यावसायिक यांच्यात समन्वय करुन समझोता करण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. त्यामध्ये आमदार लांडगे यांना यश मिळाले आहे.

या प्रभागातील लोकप्रतिनिधी आणि माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेविका सारिका नितीन बोऱ्हाडे, तसेच निखिल बोऱ्हाडे, निलेश बोराटे, नितीन बोऱ्हाडे यांनी यासाठी पुढाकार घेतला आहे.

> "भोसरी मतदार संघातील समाविष्ट गावांमध्ये 1997 पासून प्रलंबित विकासकामांना आम्ही गती दिली. 2014 पासून पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यावर आम्ही भर दिला. त्यामुळे चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर विकसित झाला आहे. वाढती लोकसंख्या आणि वाहनांमुळे वाहतुकीवर ताण येत आहे. त्यामुळे विकास आराखड्यातील रस्ते विकसित करण्यास प्राधान्य दिले जात आहे. आगामी काळात वाहतूक कोंडीमुक्त पिंपरी-चिंचवड असा संकल्प आहे. त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वोतोपरी पुढाकार घेणार आहोत.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# अभिजात मराठी भाषा सप्ताहात 'सुर', 'शब्द' आणि 'शौर्य' यांचा संगम..!

## महापालिका आयोजित कार्यक्रमांतून मराठी चित्रपटसृष्टी, रंगभूमी आणि लोककलेचा उभा राहिला अभिमान

**पिंपरी | प्रतिनीधी**

मराठी भाषेचा गंध, चित्रपटसृष्टीचा तेजोमय प्रवास आणि सुरांचा सुवास... या त्रिवेणी संगमातून 'अभिजात मराठी भाषा सप्ताहात' एक अविस्मरणीय सांस्कृतिक क्षण उजाडला. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये झालेल्या 'राजा हरिश्चंद्र ते हरिश्चंद्राची फॅक्टरी' या कार्यक्रमातून रुपेरी पडद्यावरच्या मराठी चित्रपटांचा शंभरहून अधिक वर्षांचा इतिहास सुरेल गाण्यांच्या माध्यमातून रसिकांसमोर उलगडला गेला आणि एकप्रकारे रसिकांनी या स्वरयात्रेतून चित्रपटसृष्टीचा प्रवासच अनुभवला. तर मराठी नाटक 'सूर्याची पिल्ले' आणि शाहिरी पोवाड्यांचा कार्यक्रम 'गजर मराठीचा.... जागर शाहिरीचा' या कार्यक्रमांना देखील प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

पिंपरी चिंचवड महापालिका आयोजित तसेच अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा आणि महाराष्ट्र साहित्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा यांच्या सहकार्याने, तसेच श्री भैरवनाथ सार्वजनिक ग्रंथालय, भोसरी आणि हुतात्मा चापेकर सार्वजनिक ग्रंथालय, चिंचवड यांच्या सहभागातून ३ ते ९ ऑक्टोबर २०२५ दरम्यान 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' साजरा होत आहे.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या अधिपत्याखाली साजरा करण्यात येणाऱ्या या महोत्सवात मराठी चित्रपटसृष्टीचा सुवर्ण प्रवास मांडणारा 'राजा हरिश्चंद्र ते हरिश्चंद्राची फॅक्टरी' हा कार्यक्रम सादर झाला. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त अतुल पाटील, विशेष अधिकारी तथा मराठी समन्वय अधिकारी किरण गायकवाड, समाजसेवक विशाल शेडगे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखेचे राजेंद्र बंग, संतोष रासणे यांच्यासह महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





या कार्यक्रमात सुरेल गाण्यांचे सादरीकरण करीत रसिकांना भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांच्या १९१३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'राजा हरिश्चंद्र' चित्रपटापासून आजच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या चित्रपटापर्यंत नेले. बाबुराव पेंटर यांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीचे चित्रपटसृष्टीसाठी योगदान, प्रभात फिल्म कंपनीच्या स्थापनेची प्रेरणादायी कथा, पहिला बोलपट 'अयोध्येचा राजा' याचे स्मरण, या माध्यमातून मराठी सिनेसृष्टीचा पाया पुन्हा एकदा उजळवला.

यानंतर व्ही. शांताराम यांच्या कलादृष्टीचा परिचय, पु. ल. देशपांडे यांचे मानवी भावनांना स्पर्श करणारे चित्रपट, ग. दि. माडगूळकर आणि सुधीर फडके यांच्या चित्रपटसंगीतासाठीचे योगदान, पं. हृदयनाथ मंगेशकर यांचे संगीत, आणि दादा कोंडके यांच्या हास्यविनोदाने सजलेले मराठीपण, या सगळ्यांचा संगीतमय पट रसिकांसमोर उलगडला.

'हृदयी प्रीत जागते', 'माझं ठरल्यालं लगीन मोडलं गं', 'ग साजणी', 'केव्हा तरी पहाटे', 'सुन्या सुन्या मैफलीत माझ्या', 'मन उधाण वाऱ्याचे' अशी अनेक अजरामर गाणी कलाकारांनी सादर करून प्रेक्षकांची दाद मिळवली. १९८० च्या दशकातील विनोदी आणि भयपट यांचा संगम, महेश कोठारे, सचिन पिळगावकर, अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या अभिनयाचे सुवर्णक्षण, आणि किशोरकुमार यांनी पहिले गायलेले मराठीतील गाणे, यांसह मराठी सिनेमाची उत्क्रांती रसाळ शैलीत कलाकारांनी रसिकांसमोर उलगडली.

२००० नंतरच्या काळात इतिहास, चरित्र आणि सामाजिक वास्तव सांगणारे 'कट्यार काळजात घुसली', 'नीलकंठ मास्तर', 'महाराष्ट्र शाहीर' यांसारखे चित्रपट मराठी सिनेमा नव्या उंचीवर घेऊन गेले, हेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. संगीतकार अजय–अतुल यांच्या सुरेल मेडलेने कार्यक्रमाचा उत्कर्षबिंदू साधला. 'लखलख चंदेरी तेजाची न्यारी दुनिया' या गाण्याने मराठी चित्रपटसृष्टीतील प्रत्येक कलाकार, तंत्रज्ञ तसेच या चित्रपटसृष्टीसाठी योगदान देणाऱ्या प्रत्येकाला मानाचा मुजरा करण्यात आला.

संजय चांदगुडे व प्रशांत बरीदे यांनी उत्कृष्ट निवेदन केले. गायक समीर नगरकर, पियुष भोंडे, अजय खटावकर, प्रशांत व्ही. साळवी, अजिंक्य देशपांडे, गायिका शुभ्रा घायतडके, निशा गायकवाड, सुवर्णा कोळी, प्रियल निळे, सावनी सावरकर यांनी विविध गाण्यांचे सादरीकरण केले. त्यांना वादक अमृता दिवेकर, अमन सय्यद, विशाल थेलकर, सचिन वाघमारे, अभिजित भदे, नागेश भोसेकर, हर्षद गणबोटे यांनी साथ दिली.

# रस्ता पूर्ण झाल्यावर जर खोदण्यात आला तर 10 पट दंडासह गुन्हा दाखल करणार

## राष्ट्रीय पातळीवरील पुणे ग्रँड चॅलेंज ही सायकल स्पर्धा पुढील वर्षी जानेवारी 2026 मध्ये आयोजित करण्यात आली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे ग्रँड चॅलेंज सायकल स्पर्धेसाठी रस्ते चकचकीत केले जाणार आहेत. हे तयार केल्यानंतर तसेचस्पर्धा झाल्यावर ड्रेनेज, पाइपलाइन केबलसह इतर कामासाठी खोदल्या जाऊ नये व त्यांचा दोषदयित्व कालावधी संपूष्टात येऊ नये, यासाठी महापालिकेच्या पथ विभागाने आतापासून खबरदारी घेतली आहे. सोमवारी सर्व शासकीय अधिकाऱ्यांची बैठक घेत या रस्त्यांवर ड्रेनेज, पाईपलाइन, भूमिगत केबल टाकण्याची कामे रस्ते तयार करण्यापूर्वी पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले असून रस्ता पूर्ण झाल्यावर जर ते खोदण्यात आले तर, अशा विभागाला १० पट दंड ठोठावून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे यानं दिली.

राष्ट्रीय पातळीवरील पुणे ग्रँड चॅलेंज ही सायकल स्पर्धा पुढील वर्षी जानेवारी २०२६ मध्ये पुणे शहर आणि जिल्ह्यात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचा मार्ग पुणे शहरातून ५५ किमी तर पुणे कॅन्टोन्मेंट आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचा असा एकूण ७५ किमी मार्गांचे नुतनीकरण केले जाणार आहे. त्यासाठी महापालिका सुमारे १४५ कोटी रुपये खर्च करणार आहे. ही कामे चार टप्प्यात विभागली आहेत. या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्या तयारीसाठी आयुक्त नवल किशोर राम यांनी सोमवारी महत्त्वपूर्ण आढावा बैठक घेतली. या बैठकी वरील आदेश देण्यात अआल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त दिवटे यांनी दिली.




### मार्गांचे नुतनीकरण

**» राष्ट्रीय पातळीवरील पुणे ग्रँड चॅलेंज ही सायकल स्पर्धा पुढील वर्षी जानेवारी २०२६ मध्ये पुणे शहर आणि जिल्ह्यात आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचा मार्ग पुणे शहरातून ५५ किमी तर पुणे कॅन्टोन्मेंट आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचा असा एकूण ७५ किमी मार्गांचे नुतनीकरण केले जाणार आहे. त्यासाठी महापालिका सुमारे १४५ कोटी रुपये खर्च करणार आहे.**

या बैठकीला पथ विभाग, पाणीपुरवठा, ड्रेनेज, एमएसईबीसीएल, ट्रॅफिक पोलीस तसेच ओएफसी केबल टाकणाऱ्या दोन कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आयुक्तांनी बैठकीत विभागीय समन्वयावर विशेष भर देत सर्व कामे नियोजनपूर्वक आणि वेळेत पूर्ण करण्याचे आदेश दिले. सायकल मार्ग आकर्षक आणि सुरक्षित बनवण्यासाठी फिडर पिलर व स्ट्रीट लाईट्सचे पेंटिंग, तसेच बॅनर, पोस्टर, कचरा, राडारोडा आणि बांधकाम साहित्य तातडीने हटवण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच, रस्त्याच्या डिव्हायडरला काळा-पिवळा रंग देऊन सौंदर्यीकरण, तसेच गवत व झुडपे साफ करण्याच्या सूचना देण्यात आल्या. आयुक्तांनी पदपथ दुरुस्तीसाठी १० कोटी रुपयांपर्यंतचा निधी उपलब्ध करून देण्याचे आदेशही दिले. फुटपाथवर बसवण्यात येणाऱ्या पेवर ब्लॉकचे मानकीकरण करण्यासाठी काळा आणि पिवळा रंग निवडण्यात आला असून, त्याचा नमुना प्रयोग करून अंतिम निर्णय घेण्यात येईल, असेही आदेश आयुक्तांनी दिले. आयुक्तांनी गणेशखिंड रस्ता आणि म्हात्रे पूल परिसरात खड्डे बुजवण्याच्या प्रक्रियेची प्रत्यक्ष पाहणी करून अधिकाऱ्यांना कार्यक्षमतेसाठी सूचना दिल्या.

### विविध कामासाठी रस्त्याची खोदाई

**» पुणे महापालिकेच्या पथ विभागाने २०२३ मध्ये सुमारे ३०० कोटी रूपये खर्च करून पाच पॅकेजमध्ये सुमारे १०० किलोमीटर लांबीचे रस्ते तयार केले होते. या रस्त्यासाठी पाच वर्ष दोष दायित्व (डिफेक्ट लायबिलिटी पिरियड-डीएलपी) कालावधी होता. पण या रस्त्यावर पालिकेच्या पाणी पुरवठा, ड्रेनेज यासह अन्य विभागासह केंद्र आणि राज्यसरकारचे विभाग, खाजगी केबल कंपन्यांनी विविध कामासाठी रस्त्याची खोदाई केली आहे.**

पथ विभागाने खोदाईला परवानगी दिल्यामुळे या रस्त्याचा दोष दायित्व कालावधी संपुष्टात आला आहे. त्यामुळे हे रस्ते दुरूस्त करण्याची जबाबदारीतुन संबंधित ठेकेदार मुक्त झाले असुन पालिकेवर हा खर्चाचा भार पडत आहे. परिणामी सायकल स्पर्धेसाठी बांधण्यात येणाऱ्या रस्त्यांची ही व्यवस्था होऊ नये यासाठी आयुक्तांनी आधीच कामे पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत.

# बेकायदा फ्लेक्सबाजीच्या विरोधात कारवाईसाठी महापालिकेचे वरिष्ठ अधिकारी उतरणार

## रस्त्यावरदररोज पाच जणांवर गुन्हे दाखल करण्याचे दिले आदेश, बेकायदा फ्लेक्सबाजी विरोधात कारवाईचे आदेश देण्यात आले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेची निवडणुक पुढच्या काही काळात होणार आहे. निवडणुकीत इच्छुक उमेदवारांनी शहरात ठिकठिकाणी बेकायदा फ्लेक्सबाजी करुन शहर विद्रुप केले आहे. यावर नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे. सूचना देवून कारवाई होत नसल्याने आता थेट महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना रस्त्यावर उतरण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत. दररोज पाच जणांविरोधात गुन्हे दाखल करा, असे आदेशही क्षेत्रीय कार्यालय स्तरावर दिले गेले आहे. त्यामुळे शहरात बेकायदा फ्लेक्सबाजीवर आता तरी नियंत्रणात राहणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



शहरात बड्या राजकीय नेत्यासह इच्छुक उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात फ्लेक्सबाजी केली जात आहे. यासोबतच खासगी क्लास चालक, बांधकाम व्यवसायिकांकडून जाहिराती केल्या जात आहे. या बेकायदा फ्लेक्सबाजी विरोधात कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु राजकीय नेत्यांचे फ्लेक्सवर कारवाई न करता इतर फ्लेक्स काढून टाकण्यात आल्याची माहिती समोर आली होती. त्यानंतर शहर स्वच्छ करण्याचे आदेश दिले आहेत.

शहराच्या विद्रुपीकरणांत सर्वात मोठा वाटा हा बेकायदा फ्लेक्सबाजीचा आहे. अनधिकृतपणे विद्युत खांब, सार्वजनिक दिवे, सिग्नलचे खांब, चौकात पहाड उभे करून फ्लेक्सबाजी केली जात आहे. विविध कार्यक्रमांचे आयोजन, वाढदिवस, सणांच्या शुभेच्छा देण्यासाठी फ्लेक्सबाजी केली जात आहे. या फ्लेक्सबाजीमुळे शहराच्या विद्रुपीकरणात भर पडत आहे. काही ठिकाणी हे फ्लेक्स धोकादायक पद्धतीने उभे केले जातात किंवा लावले जातात. रस्त्यावर असलेल्या सार्वजनिक दिव्यांचे खांब, तसेच दुभाजकावर असलेल्या दिव्यांच्या खांबावर लावलेले फ्लेक्स हे धोकादायक ठरत आहे. या वाहन चालकांना याचा त्रास सहन करावा लागतो. काही ठिकाणी हे फ्लेक्स योग्य पद्धतीने लावले न गेल्याने ते पडतात, त्याचा वाहतुकीलाही त्रास होत असतो. प्रशासनाने या फ्लेक्सबाजीच्या विरोधात पावले उचलण्यास सुरुवात केली असली तरी राजकीय फ्लेक्स उतरविणे, त्यांच्यावर दंडात्मक कारवाईचे धाडस दाखविणार का? हे लवकरच स्पष्ट होईल.

> **“बेकायदा फ्लेक्स बाजी करणाऱ्यांवर नियंत्रण आणण्यासाठी काही ठोस पावले उचलण्याचा प्रशासन विचार करीत आहे. फ्लेक्सचे प्रिंटींग करणाऱ्या व्यावसायिकांची एक बैठक बोलाविली जाणार आहे. प्रत्येक फ्लेक्सवर प्रिंटरचे नाव टाकणे बंधनकारक केले जाईल. अनधिकृत फ्लेक्सची प्रिंटींग करणाऱ्यावर नियंत्रण आणता येईल.”**
>
> **- पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त आयुक्त , पुणे महापालिका.**

# वाहतूककोंडीवर शिक्रापूरात जनआक्रोश! कृती समितीने रस्ता रोखला

## तरुणांनी मुंडन करून केला प्रशासनाचा निषेध, शिक्रापूर येथे नियमित होणारी वाहतूक कोंडी ही स्थानिकांची डोकेदुखी ठरत आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शिक्रापूर (ता. शिरुर) येथे नियमित होणारी वाहतूक कोंडी ही स्थानिकांची डोकेदुखी ठरत आहे. त्यात प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने संतापाचा उद्रेक झाला. वाहतूक कोंडी व खड्डयांच्या समस्येबाबत स्थानिकांनी आक्रमक होऊन जनआंदोलन केले. यावेळी गावकरी प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने एकवटले. तरूणांनी मुंडन करून बांधकाम विभागाचा निषेध केला. प्रशासनाने वाहतूककोंडीबाबत उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा ट्राफिक मुक्त शिक्रापूर कृती समितीच्या वतीने दिला आहे.



शिक्रापूर येथे नियमित होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी ट्राफिक मुक्त शिक्रापूर कृती समितीच्या माध्यमातून प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी पोलीस प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदने देत जनआंदोलन पुकारले होते. माजी आमदार काकासाहेब पलांडे, सरपंच रमेश गडदे, माजी उपसरपंच मयूर करंजे, सुभाष खैरे, त्रिनयन कळमकर, माजी सरपंच रामभाऊ सासवडे, ट्राफिक मुक्त शिक्रापूर कृती समितीचे अक्षय भुजबळ, रवींद्र भुजबळ, सतीश सासवडे, अंकुश घारे, मंगल सासवडे, राजेंद्र मांढरे, कांतीलाल गवारे, निलेश थोरात, गौरव करंजे, शिवाजी मांढरे भाऊसाहेब केवटे, काकासाहेब चव्हाण, विजय लोखंडे, पंढरीनाथ गायकवाड, अमर करंजे, अशोक

धुमाळ आदींच्या उपस्थितीत जनआंदोलन सुरु झाले. मात्र, प्रत्येक विभागाला निवेदन देऊन देखील फक्त उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक दीपरतन गायकवाड, प्रादेशिक परिवहन अधिकारी नानासाहेब शिंदे, वाहतूक विभागाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देवकर उपस्थित होते. बांधकाम विभागाचे कोणी फिरकले देखील नाही. दरम्यान, रस्त्यावरील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुरुस्त करावेत, पोलिसांनी विरुद्ध दिशेने येणारी वाहतूक बंद करावी, तसेच प्रशासनाने वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी करीत सर्व विभागांच्या पदाधिकाऱ्यांची पोलिसांच्या माध्यमातून बैठक बोलावावी, अशी मागणी केली.

यावेळी स्थानिकांनी प्रशासनाबाबत नाराजी व्यक्त करीत मनोगत व्यक्त केले. माजी आमदार सूर्यकांत पलांडे यांनी थेट रस्त्यावर ठिय्या मांडला. दरम्यान, आंदोलकांच्या मागण्यांचे निवेदन उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले यांच्याकडे देण्यात आले. पुढील कामात प्रशासनाने कडक पावले उचलून वाहतूक कोंडीसाठी उपाययोजना न केल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) येथे नियमित होणारी वाहतूक कोंडी ही स्थानिकांची डोकेदुखी ठरत आहे. त्यात प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याने संतापाचा उद्रेक झाला. वाहतूक कोंडी व खड्डयांच्या समस्येबाबत स्थानिकांनी आक्रमक होऊन जनआंदोलन केले. यावेळी गावकरी प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने एकवटले. तरूणांनी मुंडन करून बांधकाम विभागाचा निषेध केला.

### बांधकाम विभागाबाबत नाराजी..

» शिक्रापूर येथे पुकारण्यात आलेल्या आंदोलनात वाहतूक कोंडीचा विषय असताना वाहतूक कोंडीला मुख्य कारण रस्त्यावरील खड्डे, चुकीचे अतिक्रमण हे असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे कोणीही फिरकले नसल्याने आंदोलकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

"शिक्रापूरमधील वाहतूककोंडीबाबत आपण स्वतः पाहणी केलीअसूनसार्वजनिकबांधकामविभागाच्याअधिकाऱ्यांशी संपर्क साधला असून या आठवडाभरात आंदोलकांसह सर्वांची एक बैठक घेऊन वाहतूक कोंडी सोडवण्याबाबत दिशा ठरवणार आहे.

\- प्रशांत ढोले, उपविभागीय पोलीस अधिकारी.

---

# पुणे जिल्ह्यात 7 नगराध्यक्ष महिला ; आरक्षण सोडतीत महिलांचा डंका

## पुणे जिल्ह्यातील 14 नगरपरिषदांपैकी 4 ठिकाणी आणि 4 नगरपंचायतींपैकी 3 ठिकाणी नगराध्यक्षपद महिलांकडे जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील नगरपंचायतींसाठी नगराध्यक्षपदाची सोडत सोमवारी जाहीर करण्यात आली. पुणे जिल्ह्यातील 14 नगरपरिषदांपैकी 4 ठिकाणी आणि 4 नगरपंचायतींपैकी 3 ठिकाणी नगराध्यक्षपद महिलांकडे जाणार आहे. तसेच दोन ठिकाणी अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठी नगराध्यक्षपद राखीव राहणार आहे. आठ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदे खुली राहणार आहेत. बुधवारी (दि. 8) यासर्व नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या प्रभाग निहाय प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.



पुणे जिल्ह्यातील दौंड, शिरूर आणि जुन्नर येथील नगरपरिषदांचे नगराध्यक्षपद इतर मागासवर्गीय (ओबीसी) महिलांसाठी राखीव राहणार आहे. तर चाकण नगरपरिषदेचे नगराध्यक्षपद खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव असेल. त्यामुळे या चार नगरपरिषदांमध्ये महिला नगराध्यक्षा असतील. फुरसुंगी-उरळी देवाची आणि लोणावळा नगरपरिषदांचे नगराध्यक्षपद अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. यंदा पुणे जिल्ह्यात मंचर, माळेगाव आणि वडगाव मावळ या नगरपंचायतींच्या निवडणुका होणार आहेत.

यापैकी मंचर नगरपंचायतीचे नगराध्यक्षपद इतर मागासवर्गीय (ओबीसी) महिलांसाठी राखीव राहील, तर वडगाव मावळ नगरपंचायतींची नगराध्यक्षपदे खुल्या प्रवर्गातील महिलेसाठी खुले राहणार आहे. याच बरोबर माळेगाव नगरपंचायतीचे नगराध्यक्षपद अनुसूचित जातीसाठी राखीव राहणार आहे.

देहू नगरपंचायतीचा कार्यकाळ जानेवारी 2027 मध्ये संपणार आहे; मात्र त्यावेळी वेगळी प्रक्रिया राबविण्याऐवजी आताच नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे पुणे

जिल्ह्यातील 14 नगरपरिषदांपैकी 4 ठिकाणी आणि 4 नगरपंचायतींपैकी 3 ठिकाणी नगराध्यक्षपद महिलांकडे जाणार आहे. तसेच दोन ठिकाणी अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठी नगराध्यक्षपद राखीव राहणार आहे. आठ नगरपरिषदांच्या नगराध्यक्षपदे खुली राहणार आहेत. यासर्व नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या प्रभाग निहाय प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.

### देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षपदाचे आरक्षणही जाहीर..

» देहू नगरपंचायतीचा कार्यकाळ जानेवारी 2027 मध्ये संपणार आहे; मात्र त्यावेळी वेगळी प्रक्रिया राबविण्याऐवजी आताच नगराध्यक्षपदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. देहू नगरपंचायतीचे नगराध्यक्षपद खुल्या महिला प्रवर्गासाठी राखीव राहणार आहे.